# ‘सीएमआरएस’ प्रमाणपत्रासाठी अर्ज प्रक्रियेस पुढील आठवड्यात सुरुवात

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** कुलाबा - वांद्रे -सीप्झ ‘मेट्रो ३’ मार्गिकेतील आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्यातील रखडलेली मेट्रो आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएमआरएस) प्रमाणपत्र घेण्याची प्रक्रिया अखेर मार्गी लागणार आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) पुढील आवड्यापासून प्रमाणपत्राच्या प्रक्रियेला सुरुवात करेल. त्यानुसार अर्ज केला जाईल. दरम्यान, पहिल्या टप्प्याचे अजूनही तीन टक्के काम पूर्ण होणे शिल्लक आहे.

‘एमएमआरसी’कडून ३३.५ किमीच्या ‘मेट्रो ३’ चे काम सुरू आहे. यातील आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा आतापर्यंत वाहतूक सेवेत दाखल होणे अपेक्षित होते. मात्र या टप्प्यास विलंब झाला. तर आता विधानसभा निवडणूक आचासंहितेपूर्वी हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याचा प्रयत्न राहील. मात्र या टप्प्याचे अजूनही काम अपूर्ण आहे. ९७ टक्के काम पूर्ण झाले असून तीन टक्के काम शिल्लक आहे. अशात काही स्थानकांत अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्याने सुरक्षा प्रमाणपत्र प्रक्रिया रखडली आहे.

पण, आता मात्र आचार संहितेपूर्वी सुरक्षा प्रमाणपत्र घेत पहिला टप्प्याचे संचालन सुरू करण्याच्या दृष्टीने सुरक्षा प्रमाणपत्र प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.अर्ज प्रक्रियेनंतर दिल्लीहून ‘सीएमआरएस’चे पथक मुंबईत दाखल होईल. त्यानंतर चाचणी होऊन प्रमाणपत्र दिले जाईल.